# जनसंपर्क अधिकारी कार्यालय, पालघर

**P.R.O. Office,Palghar**
phone no 02525-297032,Mo No 8669604078
Address-sp office Bidco Road,Palghar west
E-Mail- propalghar@gmail.com

## प्रेसनोट क्र. ५९३ दिनांक १८/०७/२०२०

१.फिर्यादी पुरुष वय ४६वर्षे रा.विरार प ता.वसई जि.पालघर, यांनी फिर्याद दिली की, दि. १५/०७/२०२० रोजी सायंकाळी १९.१५वा.चे सूमारास फिर्यादी हे आपल्या ताब्यातील इर्टिगा गाडी चालवुन घेवुन जात असतांना यातील मयत अनोळखी मोटसायकल स्वार हा त्याचे ताब्यातील मोटारसायकल भरधाव वेगात व हयगयीच्या विचाराने वाहतुकीच्या नियमांकडे दुलर्क्ष करुन इर्टिगा गाडीस ओवरटेक करत असतांना रस्तावर पडलेल्या पाण्यावरुन स्लीप होवुन पडून त्यात त्याचे डोक्यास गंभीर दुखापत झाल्याने तक्रारदार यांनी दवाउपचारा करीता रुग्णालयात वसई येथे घेवुन गेले असता त्यास डॉक्टरांनी तपासनु दाखलपुर्व मयत घोषित केले म्हणुन यातील आरोपीत हा स्वत:च्या मरणास कारणीभुत झाला म्हणुन **वालीव पोलीस ठाणे** गु.र.नं.I ६४२/२०२० भा.दं.वि.सं.कलम ३०४(अ), २७९, ३३७, ३३८ मो.वा.का कलम १८४ प्रमाणे गुन्हा दाखल केला असुन पुढील तपास चालु आहे.

२.फिर्यादी पोशि/६४३ संतोष नारायण वाकचौरे नेम.बाकईसर पोलीस स्टेशन, यांनी फिर्याद दिली की, दि. १७/०७/२०२० रोजी रात्री ०१.२० वा.चे सुमारास आरोपीत हा बोईसर एम.आय.डी.सी. मधील आर सी हॉटेलच्या बाजूला असलेल्या भिंतीच्या आडोश्यास अंधारात लपून छपून आपले अस्तीत्व लपवीत असतांना मिळून आला व त्यास सदर ठिकाणी येण्याचे कारण विचाराले असता त्यांनी काही एक समाधान कारक उत्तरे दिली नसून उडवा उडवीची उत्तरे दिली म्हणून **बोईसर पोलीस ठाणे** गु.र.नं. I २३०/२०२० महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम १२२ प्रमाणे गुन्हा दाखल केला असुन पुढील तपास चालु आहे.

३.फिर्यादी पोशि/३४३ वैभव यशवंत जामदार नेम.बोईसर पोलीस स्टेशन, यांनी फिर्याद दिली की, दि.१७/०७/२०२० रोजी ०३.३० वा.चे सुमारास आरोपीत हा बोईसर आझादनगर कॉलनी बॉम्बे रेऑन कंपनी समोरील झुडपामध्ये आडोशास अंधारात लपून छपून आपले अस्तीत्व लपवीत असतांना मिळून आला व त्यास सदर ठिकाणी येण्याचे कारण विचाराले असता त्यांनी काही एक समाधान कारक उत्तरे दिली नसून उडवा उडवीची उत्तरे दिली म्हणून **बोईसर पोलीस ठाणे** गु.र.नं.I २३१/२०२० महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम १२२ प्रमाणे गुन्हा दाखल केला असुन पुढील तपास चालु आहे.

४. फिर्यादी महिला वय-३५ वर्षे नेम-परिचारीका रा. धाकटी डहाणु पोस्ट-डहाणु ता.डहाणु जि.पालघर, यांनी फिर्याद दिली की, दि.२२/०६/२०२० रोजी रात्री ११.३० वाजता आरोपीत हे कोरोना पॉझिटीव असल्याचे माहीत असतांना देखील तो गॅलेक्सी हॉस्पीटल वसई पुर्व येथुन खाजगी वाहन करुन भदोई इलाहाबाद उ.प्रदेश येथे गेले म्हणुन आरोपीत याने मा.जिल्हाधिकारी यांचे मनाई आदेशा बाबत सुचना देवुनही मा.जिल्हाधीकारी यांचे मनाई आदेशाचा भंग केला म्हणून **वालीव पोलीस ठाणे** गु.र.नं.I ६४१/२०२० भा.दं.वि.सं.कलम १८८,२६९,२७० सह राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ चा कलम- ५१ (ब) प्रमाणे गुन्हा दाखल केला असुन पुढील तपास चालु आहे.